# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०५/२०१८

**१)महिलेस विटाने जबर दुखापत करुन जिवाने ठार मारल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५+२६/०५/२०१८ चे ०१८ वाजता दरम्यान यातील मृतक महिला श्रीमती शेवतांबाई शंकर ठाकरे वय ५० वर्ष रा. आथली अंगनवाडी चपराशी ही तिचे घरी एकटीच झोपली असता कोणीतरी अज्ञात ईसमाने तिचे घरासमोरील फाटक बाजुला करुन घरात प्रवेश करुन महिलेचे डोक्यास विटेने जबर दुखापत करुन जिवाने ठार मारल्याने फिर्यादी शालीक मारोती कोडापे वय ४४ वर्ष, रा. करांडला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०२,४५० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. बन्सोडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) स्विप्ट डिझायर कारच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक २३/०५/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नागेश जगन रामटेके वय ३२ वर्ष, रा. मोखारा याने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३२ पी २६८९ हा चालवित असतांना समोरुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन ट्रॅक्टरला पालोरा येथे धडक मारुन चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) दोन वाहनांची एकमेकांस धडक लागुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/०५/२०१८ चे १६.४० ते १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन एकमेकांना मुजबी/ महामार्ग क्र. ६ नागपुर रोड भंडारा येथे धडक देवुन अपघात होण्यास व गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने अपघात रजिस्टर क्र. ४८/१८ दिनांक २५/०५/२०१८ चे अन्वये चौकशीअंती निष्पन्न झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. गिरडकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन कपाळावर रेतीमातीचे विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २६/०५/२०१८ चे ०२.१५ वाजता दरम्यान यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत सेंट्रीगचे लाकडी पाटया जाळण्याकरीता फिर्यादीने नकार दिल्याचे वादा वरुन आरोपी क्र. १ व ३ यांनी फिर्यादीस धरुन ठेवुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे कपाळावर, खांदयावर रेतीमातीचे विटाने मारुन जखमी केल्याने फिर्यादी कुणाल विलास वासनिक वय २५ वर्ष रा. सुभाष वार्ड बेला यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अचानक प्रकृती खराब झाल्याने युवकाचा मृत्यु . :—**

दिनांक २६/०५/२०१८ चे ०६.१५ वाजता दरम्यान यातील मृतक अमल बलराम टेकाम वय २१ वर्ष, रा. आदीवासी मुलांचे शासकीय वस्तीगृह तुमसर याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे नेले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो व फिर्यादी हरिचंद्र रामचंद्र सरीयाम वय ५२ वर्ष, रा. आदीवासी मुलांचे शासकीय वस्तीगृह तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**६) विज कडकडाळुन पडल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २६/०५/२०१८ चे ०२.४५ वाजता दरम्यान यातील मृतक रामचंद्र गजानन उपरीकर वय ५५ वर्ष, रा. लाखोरी हा त्याचे स्लॅपवरील वाळण्यास टाकलेले चने अचानक आलेल्या वादळ पावसामुळे भिजु नये म्हणुन स्लॅपवरील चने गोळा करुन खाली आणले व स्लॅप वरील ताडपत्री काढत असतांना अचानक जोराने विज कडकडाळुन पडल्याने मृतक हा स्लॅप वरुन ताडपत्रीसह खाली पडल्याने त्याचे डोक्याला मार लागुन मृतक मरण पावल्याने फिर्यादी रमेश श्रावण सार्वे वय ५८ वर्ष, रा. लाखोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) अवैध हातभट्टी,देशी दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २६/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, करडी, तुमसर, लाखणी, व अडयाळ येथे हातभट्टी, देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २८७ लिटर हातभट्टी + ४५७ किलो सडवा मोहा + साहीत्य किंमती ५२,१६५/–रु. व ७ लिटर ९२० मिली लिटर देशी दारु किंमती २,६४०/–रु. असा एकुण किंमती ५४,८०५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २६/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– ०४ ईतर वाहनांवरती – ८० केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.